# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 30.09.2026** **वार : बुधवार**

---

## ठळक बातम्या

1. देशाची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी एकत्रितपणे काम करावं; केंद्रिय कृषीमंत्र्यांचं आवाहन.
2. महाराष्ट्रातल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणखी 43 तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करण्याचा निर्णय.
3. अमेरिकेच्या कोणत्याही धमकीला किंवा कारवाईला इराण त्वरित प्रत्युत्तर देईल, इराणचा इशारा.
4. आशियाई क्रीडा स्पर्धेत आज भारताची सुवर्ण कामगिरीसह सुरुवात.

## सविस्तर बातम्या

### शिवराज परिषद

देशाची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी एकत्रितपणे काम केलं पाहिजे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. ते काल नवी दिल्लीत आयोजित 'रब्बी परिषद 2026' च्या अंतिम सत्राला संबोधित करताना बोलत होते. यावेळी चौहान यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत दहापेक्षा अधिक राज्यांच्या कृषी मंत्र्यांना 1,200 कोटी रुपयांहून अधिक रकमेची आर्थिक मंजुरी पत्रं दिली. यामध्ये उत्तर प्रदेशला सर्वाधिक 601 कोटी रुपयांचा निधी मिळाला, तर पश्चिम बंगालला 290 कोटी रुपये आणि हरियाणाला 198 कोटी रुपये देण्यात आले. छत्तीसगडला 181 कोटी रुपये आणि अरुणाचल प्रदेशला 154 कोटी रुपये देण्यात आले.

### दुष्काळ निर्णय

महाराष्ट्रातल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणखी 43 तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करण्याचा निर्णय दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी राज्यातील 265 तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-1'च्या निकषानुसार दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या 43 तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-2'ची परिस्थिती आढळून आली आहे. या 43 तालुक्यांसह इतर प्रभावित भागांचे वस्तुस्थितीदर्शक सर्वेक्षण करण्यात येणार असून, त्याचा अंतिम अहवाल 25 ऑक्टोबरपर्यंत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, दुष्काळग्रस्त 265 तालुक्यांमधल्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांकडून परीक्षाशुल्क न घेता परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरुन घेण्याच्या सूचना राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं सर्व विभागांना दिल्या आहेत.

दरम्यान, महाराष्ट्रातली दुष्काळसदृश परिस्थिति आणि आगामी रबी हंगामातल्या संभाव्य अडचणी लक्षात घेऊन राज्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. नवी दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय कृषि संमेलनात काल त्यांनी राज्याची भूमिका मांडली. राज्यातल्या शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लवकरात लवकर पाहणी दौरा करावा अशी विनंती भरणे यांनी यावेळी केली.

**राष्ट्रीय कला प्रदर्शन**

केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी काल नवी दिल्लीत सुरू असलेल्या 65व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनात 20 पुरस्कार विजेत्या कलाकारांना सन्मानित केलं. यावेळी त्यांनी ललित कला अकादमीच्या विविध उपक्रमांमधल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. सर्जनशीलता आणि शाश्वतता यांचा मेळ घालण्याच्या मुद्द्यावर बोलतांना ते म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा ही संस्कृती हा उपक्रम सर्जनशीलता आणि सेवाभाव यांच्या संगमाचं उत्तम उदाहरण आहे. हे प्रदर्शन ललित कला अकादमीतर्फे आयोजित करण्यात आलं असून प्रदर्शनाचा कालावधी 1 महिन्यासाठी वाढवण्यात आला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमात पुरस्कार विजेत्या 20 कलाकारांचा सत्कार करण्यात येणार असल्याचं शेखावत यांनी सांगितलं.

**आसाम अरुणाचल-बैठक**

आसाम-अरुणाचल प्रदेश आंतरराज्य सीमा आणि दोन्ही राज्यांच्या 12 क्षेत्रीय समित्यांद्वारे केल्या जाणाऱ्या संयुक्त भेटींच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी काल एका बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. अरुणाचल प्रदेशचे गृहमंत्री मामा नटुंग या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत, सर्व समित्यांच्या अध्यक्षांना आवाहन करताना ते म्हणाले की आसाममधल्या आपल्या समकक्ष सदस्यांशी समन्वय राखून, तसेच संवाद आणि परस्पर सामंजस्याच्या भावनेतून क्षेत्रीय भेटींची प्रक्रिया गतिमान करावी. आंतरराज्य सीमेवर शांतता, सलोखा आणि सौहार्दपूर्ण संबंध दृढ करत, सामंजस्याने आणि सर्वांना मान्य होईल असा तोडगा काढण्यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण चर्चा आणि विधायक राजकीय एकमतावर भर दिला.

**अमेरिका इराण-संघर्ष**

अमेरिकेच्या कोणत्याही धमकीला किंवा कारवाईला इराण त्वरित प्रत्युत्तर देईल असा इशारा इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालीबाफ यांनी दिला आहे. इराण आता कुठल्याही दबावाला घाबरून आपल्या मागण्या आणि अधिकारांपासून मागं हटणार नाही असं गालीबाफ यांनी काल संसदेच्या खुल्या अधिवेशनात बोलताना सांगितलं. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या 81 व्या अधिवेशनात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या वक्तव्यांचा त्यांनी उल्लेख केला. यावरून वॉशिंग्टनने आपली शत्रुत्वाची भूमिका अजूनही बदललेली नाही हे स्पष्ट होतं असं ते म्हणाले.

अमेरिकेने जर इराणच्या राष्ट्रीय हितांविरुद्ध आणि सुरक्षेविरुद्ध कोणतही पाऊल उचललं तर त्यांना कठोर प्रत्युत्तराला तोंड द्यावं लागेल असं इराणी संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण समितीचे अध्यक्ष इब्राहिम अझीझी यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितलं.

**भारत कोरिया-बैठक**

संरक्षण उद्योग आणि लॉजिस्टिक सहकार्यासाठी भारत आणि कोरिया गणराज्याची 10 वी संयुक्त समिती बैठक काल नवी दिल्ली मध्ये आयोजित करण्यात आली होती. दोन्ही देशांनी संरक्षण आणि लॉजिस्टिक परस्पर सहकार्याचा पुनरुच्चार केल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. संरक्षण संबंध अधिक मजबूत आणि विस्तारीत करण्यासाठी या बैठकीदरम्यान चर्चा झाली. दोन्ही देशांच्या संरक्षण उद्योगातील सहकार्य अधिक दृढ करणं आणि संरक्षण उत्पादन आणि लॉजिस्टिकमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढवण्यासंदर्भात मतांची देवाणघेवाण करण्यात आली.

**भारत-अण्वस्त्रमुक्त संकल्प**

भारताने, अण्वस्त्रमुक्त जगाची निर्मिती आणि अण्वस्त्रांचं संपूर्ण निर्मूलन करण्याच्या संकल्पांची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात, अण्वस्त्रांच्या निर्मूलनासाठीच्या आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित उच्च-स्तरीय बैठकीत, परराष्ट्र मंत्रालयातील सचिव सिबी जॉर्ज यांनी भारताची भूमिका मांडली.

तत्पूर्वी जॉर्ज यांनी काल, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत वंशवाद, वांशिक भेदभाव, परकीयांप्रती द्वेष आणि त्याच्याशी संबंधित असहिष्णुता यांचा सामना करण्याबाबत भारताची ठाम भूमिका मांडली. गेल्या आठवड्यात, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या एका उच्च-स्तरीय कार्यक्रमात जॉर्ज यांनी सांस्कृतिक वारसा असलेल्या वस्तू परत मिळवण्यासाठी अधिक दृढ आंतरराष्ट्रीय सहकार्याची गरज अधोरेखित केली.

**गुटेरेस जयशंकर-भेट**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी काल न्यूयॉर्कमधल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची भेट घेतली आणि संयुक्त राष्ट्रांना भारताकडून मिळणाऱ्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केलं. ही भेट संयुक्त राष्ट्र महासभेच्या ८१ व्या अधिवेशनाच्या उच्च-स्तरीय सत्रादरम्यान झाली . सध्या सुरू असलेले संघर्ष आणि त्यांचे—विशेषतः विकसनशील देशांवर होणारे परिणाम कमी करण्याच्या गरजेवर ही चर्चा केंद्रित होती असं जयशंकर यांनी सांगितलं. या सत्रात सशस्त्र संघर्ष, हवामान बदल, अन्नसुरक्षा आणि बहुपक्षीय संस्थांमधील सुधारणा यांसारख्या जागतिक आव्हानांवर चर्चा करण्यात आली.

**नेपाळपुरपूलमाधुरी**

नेपाळमध्ये गेल्या आठवड्यात पावसामुळे ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीतल्या मृतांची संख्या ३५ वर पोहोचली आहे. पश्चिम नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला असून काली गंडकी नदी जवळच्या असंख्य वाड्या आणि घरं पुरामुळे बाधित झाली आहेत.

**क्रिकेट-पूल-पूजा**

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान, पुरुषांच्या तीन दिवसीय क्रिकेट मालिकेतला दूसरा एकदिवसीय सामना आज गुवाहाटी मधल्या बरसापारा मैदानावर खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी 2 वाजता हा सामना सुरू होईल.

**आशियाई क्रीडा स्पर्धा**

आशियाई क्रीडा स्पर्धेत आज भारतीय तीरंदाजांनी सुवर्णवेध साधला. महिलांच्या संयुक्त **तीरंदाज** संघानं चीनच्या संघाचा 4 गुणांनी पराभव करत सुवर्णपदक पटकावलं.

काल धावण्याच्या **400 मीटर रिले** स्पर्धेत भारतीय महिला संघानं सुवर्णपदक पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली. पुरुषांच्या आणि मिश्र सांघिक प्रकारातही भारताच्या संघांनी कांस्य पदक मिळवलं.

**नेमबाजी**मध्ये महिलांच्या ट्रॅप वैयक्तिक प्रकारात नीरु धांडा हिनं सुवर्णपदक मिळवलं. या प्रकारात सुवर्णपदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली आहे. तिनं आशीमा अहलावत आणि मनिषा कीर यांच्या साथीनं ट्रॅप सांघिक प्रकारात रौप्य पदक मिळवलं.

गुलवीर सिंगनं पुरुषांच्या **5 हजार मीटर धावण्या**च्या स्पर्धेत कांस्य पदक मिळवलं. त्याचं या स्पर्धेतलं हे तिसरं पदक आहे.

**मुष्टीयुद्ध** स्पर्धेत पुरुषांच्या 90 किलो वजनी गटात नरेंदर बरवालनं कास्य पदक मिळवलं.

भारत या स्पर्धेत आतापर्यंत 7 सुवर्ण, 21 रौप्य आणि 26 कांस्य अशी एकंदर 54 पदकं मिळवून पदकतालिकेत 9 व्या स्थानावर आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**